## कार्यकारी सारांश (Exeuctive Summary)

### १. सारांश :

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग यांनी व्दितीय नियंत्रण कालावधी (वित्तीय वर्ष २०११-२०१२ ते २०१५-२०१६) यासाठी "बहुवर्षीय दर विनियम - २०११" दिनांक ०४ फेब्रुवारी २०११ रोजी प्रकाशीत करुन दिनांक ०१ एप्रिल २०११ पासून लागू केले आहेत. मात्र या बहुवर्षीय दर विनियमा मधील (MYT Regulation) काही तरतुदी विषयी महावितरण कंपनीला चिंता वाटत असल्यामुळे या तरतुदीची अंमलबजावणी लांबणीवर टाकावी अशी विनंती करणारा अर्ज महावितरणने महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाला सादर केला होता. आयोगाने दिनांक २३ ऑगस्ट २०११ रोजीच्या आदेश (प्रकरण क्रमांक २४/२०११ ) यानुसार महावितरणला बहुवर्षीय दर आकृतीबंद (MYT Framework) अंतर्गत दर निश्चित कण्यास दिनांक ३१ मार्च २०१३ पर्यंत सूट दिली. मात्र महावितरणने आपल्या विनंती अर्जात नमूद केलेल्या इतर मुद्यांबाबत कोणतीही सवलत देण्यात आली नाही.

विजेची उपलब्धता वाढविण्यासाठी प्रयत्न करतांना महावितरणला विविध बाह्य घटक, प्रसंग, अडचणी व समस्यांना सतत तोंड द्यावे लागते. तसेच या घटकांवर महावितरणचे कोणतेही नियंत्रण नसते. यामध्ये वीज निर्मितीसाठी आवश्यक असणारे इंधन/ पाणी उपलब्ध नसणे, हवामानातील होणारे बदल, राज्य शासनाच्या आर्थिक व इतर धोरणांचा परिणाम, औद्योगिक व इतर संबंधीत क्षेत्रातील घडामोडी आदिंचा समावेश होतो. तसेच जलशास्त्र व पाऊस यातील बदल, अचानक येणा-या नैसर्गिक आपत्ती यामुळे वीज निर्मितीवर होणारा विपरीत परिणाम, इंधनाचा अपुरा पुरवठा, अपु-या पावसामुळे वीज निर्मिती केंद्राना आवश्यक तेवढे पाणी उपलब्ध न होणे या अडचणीमुळे महानिर्मिती / महावितरण या कंपन्यांना वीज निर्मिती करणे व तिचा पुरवठा करणे यात नेहमी अनेक समस्या उद्भवत असतात. अशा बाह्य घटकांवर महानिर्मिती / महावितरणचे कोणतेही नियंत्रण नसते.

तसेच वीजे संबंधीचे कोणतेही प्रकल्प वेळाप्रत्रकानुसार सुरु करण्यासाठी अनेक अडथळे येत असतात, यात प्रकल्पाला लागणारी जमीन संपादन करण्यात विलंब होणे, इंधन उपलब्धता नसणे, केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालय यांची परवानगी विलंबाने मिळणे, स्थानिक जनतेची वीज प्रकल्पाविरोधात आंदोलने इत्यादींचा घटकांवर मात करुन महानिर्मिती / महावितरण कंपनीला आपले

विजेच्या विक्रीसंबंधी अंदाज तयार करताना अंतर्गत व बाह्य घटनांचा सखोल व तपशीलवार व्यापक अभ्यास करण्याची नितांत गरज असते. त्यानंतरच या अभ्यासाच्या आधारे, वीज खरेदीचा अंतीम आराखडा तयार करणे शक्य होते. हंगामातील बदल, आर्थिक विकास, जागतिक अर्थव्यवस्थेत होणारे चढ-उतार अशा नियंत्रण-बाह्य घटकांचाही वीज वापर व उपयोग यांच्यावर विपरीत परिणाम होत असतो.

अशा परिस्थितीत महावितरणचे असे मत झाले आहे की, वर नमूद केलेल्या घटकांमुळे अपेक्षित वीज वापराचा नेमका अंदाज घेणे व त्यांच्याशी सुसंगत एवढी वीज अचुकपणे खरेदी करणे हे एक अतिशय अवघड व जबाबदारीचे काम आहे. म्हणून महावितरण कंपनीचा "बहुवर्षीय दर (MYT)" या संकल्पनेलाच मूळात विरोध आहे. मात्र सांविधिक आवश्यकतांच्या पूर्तीसाठी आणि महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाच्या आग्रहामुळे महाविरण, व्यवसायाचा हा आराखडा (योजना) सादर करीत आहे. बहुवर्षीय दर विनियम - वर्ष २०११ यानुसार सादर केलेला हा व्यवसाय आराखडा (Business Plan) भविष्यकाळात दर निश्चितीचा पाया (आधार) म्हणून विचारात घेतला जाणार आहे. व्यवसाय आराखडा हा विविध अंतर्गत व बाहेरच्या नियंत्रण नसणा-या घटकांवर अवलंबून असणारा एक गतिशील दस्तावेज आहे. भविष्यामध्ये घडणा-या अशा नियंत्रण नसणा-या घटकांचा संबंध वीज दरांशी जोडला तर त्याचा महावितरणच्या आर्थिक स्थितीवर विपरीत परिणाम होऊ शकतो.

## २. प्रास्ताविक (Introduction) :

महावितरण ही कंपनी अधिनियम १९५६ अन्वये एक नोंदणीकृत कंपनी आहे. महाराष्ट्र राज्य आणि मुंबईची काही उपनगरे यात ती वीज वितरण करते. मा. आयोगाने दिनांक १६ ऑगस्ट २०१२ रोजीच्या दराविषयींच्या आदेशात महावितरणने वित्तिय वर्ष २०१३-२०१४ ते २०१५-२०१६ या नियंत्रण कालावधीसाठी व्यवसाय आराखडा (Business Plan) सादर करावा व त्यात कंपनीची व्यूहरचना आणि प्रवर्तन / संचालनाची योजना (Strategic & Operational Plan) यांचा समावेश असावा असे निर्देश दिले.

महावितरणने विद्यमान अंतर्गत घटक व व्यवसायावर परिणाम करणारे बाहय वातावरण लक्षात घेऊन आपला व्यवसायाचा आराखडा तयार केला आहे. येथे महावितरण नमूद करु इच्छिते की,

व्यावसायिक आराखडा हा एक गतिशील दस्तावेज असल्याने ठराविक कालावधीनंतर वेळोवेळी अंतर्गत व बाह्य वातावरणातील बदलांची दखल घेऊन त्याचे अद्यावतीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. भविष्यामध्ये घडणा-या अशा नियंत्रण नसणा-या घटकांचा संबंध वीज दरांशी जोडला तर त्याचा महावितरणच्या आर्थिक स्थितीवर विपरीत परिणाम होऊ शकतो.

## ३. पार्श्वभूमी :

मा. आयोगाने त्यांचे पत्र दिनांक १७ जुलै २०१२ नुसार महावितरणला आदेश दिला की, महावितरणने वित्तिय वर्ष २०१३-२०१४ ते २०१५-२०१६ या कालावधीसाठी असलेल्या व्दितीय नियंत्रण कालावधीसाठी "व्यवसाय आराखडा - विनंती अर्ज" (Business Plan Petition) दिनांक २० ऑगस्ट २०१२ रोजी किंवा त्यापुर्वी, आयोगाने दिलेल्या विहीत नमुन्यात (Prescribed Formats) सादर करावा. मात्र दिनांक १६ ऑगस्ट २०१२ रोजीच्या वीज दराच्या आदेशात आयोगाने व्यवसाय आराखडा दिनांक ३० नोंव्हेबर २०१२ पर्यंत सादर करण्यास महाविरणला आदेश दिले.

त्यानुसार महावितरणने वित्तिय वर्ष २०११-२०१२ ते २०१५ -२०१६ या कालावधीचा व्यवसाय आराखडा दिनांक ३० नोंव्हेबर २०१२ रोजी सादर केला. दिनांक २६ डिसेंबर २०१२ रोजी झालेल्या "तांत्रिक विधीग्राह्यता सत्रामध्ये" (Technical Validation Session) आयोगाने महावितरणला आदेश दिला की, कंपनीने वायर व पुरवठा व्यवसायाचे विलगीकरण करणे, वीज पुरवठ्याचा व्होल्टेज निहाय खर्च, कोळशाच्या किंमतीतील चढ उतारानुसार वीज खरेदीचे दृष्य विश्लेषण (Scenario Analysis) इत्यादी बाबींचा विचार करुन आपला व्यवसाय आराखडा सादर करावा. त्यानुसार महाविरणने काही गृहितांच्या आधारे वायर व पुरवठा व्यवसाय विलग करणे व वीज खरेदीच्या विश्लेषणाचे दृश्य या बाबी विचारात घेऊन सुधारीत व्यावसायिक आराखडा सादर करीत आहे.

### हस्तांतरण योजना (Transfer Scheme) :

महाराष्ट्र शासनाने, विद्युत अधिनियम २००३ च्या कलम क्रमांक १३१, १३३व १३४ अनुसार असलेल्या अधिकांराचा वापर करुन पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या मालमत्ता, हितसंबंध, हक्क, दायित्वे, बंधने, कार्य व कर्मचारी यांचे हस्तांतरण वारसदार कंपन्यात करण्यासाठी हस्तांतरण योजना तयार केली आहे. या वारसदार संस्थांपैकी महावितरण ही एक संस्था आहे. मात्र अंतीम हस्तांतरण योजना अद्याप तयार झालेली नाही. नियंत्रण कालावधीत या संबंधीची अधीसूचना झाल्यास हस्तांतरीत मालमत्तांचे अंतीम मूल्य विचारात घ्यावे, अशी आयोगाला विनंती आहे.

**इंधन समायोजना खर्च - यंत्रणा : (FAC Mechanism)**

बहुवर्षीय दर विनियम २०११ नुसार वितरण अनुज्ञाप्तीधारकांवर त्यांनी वीज निर्मिती कंपनीला दिलेल्या इंधन आकाराची वसुली विलंबाने झाल्याने वसूल करावयाच्या झेड - फॅक्टर चार्जला पूर्व संमती मिळविण्यासाठी कालावधीचा पहिला अर्धा भाग पूर्ण झाल्यावर इंधन खर्चाचे तपशील मा. आयोगास सादर करणे सक्तीचे आहे. अपिलीय न्यायाधिकरणाने आपल्या दिनांक ११ नोव्हेंबर २०११ रोजीच्या आदेशात निर्देश दिला की, इंधन खर्च समायोजन हे शक्यतो दरमहा असावे व ते कधीही तिमाहीपेक्षा जास्त मुदतीचे नसावे. म्हणून महावितरणची विनंती आहे की, इंधन आकार वसूलीच्या विलंबाने महावितरणच्या वित्तीय स्थितीवर प्रतिकुल परिणाम होत असल्याने, मा. आयोगाने यापुढे अशा विलंबाचा चालू खर्च, दर निश्चिती कार्यवाही करतांना हिशोबात घ्यावा.

**घसारा : (Depriciation)**

बहुवर्षीय दर विनियम २०११ नुसार मालमत्तांचे नष्ट शेष मूल्य (Salvage Value) हे अनुमती योग्य (Allowable) भांडवली किंमतीच्या (Cost) शेकडा दहा टक्के असे हिशोबात घ्यावे आणि अशा मालमत्ताच्या अनुमती योग्य भांडवली किंमतीच्या कमाल ९० टक्के पर्यंत घसारा मान्य करावा. तसेच अशा प्रकारे मालमत्तेसाठी सत्तर टक्के पर्यंत घसारा दिल्यानंतर, त्या वर्षाच्या अखेरीस ३१ मार्च रोजी तिचे उर्वरित घसारा योग्य मूल्य, शिल्लक आयुष्यानुसार वाटून घ्यावे अशी तरतुद आहे. मात्र ब-याच मालमत्तांच्या बाबतीत उर्वरीत उपयोगी आयुष्या विषयीची माहिती उपलब्ध नाही म्हणून महावितरणने बहुवर्षीय दर नियमन २०११ नुसार घसा-याच्या दराचा उपयोग केला आहे व प्रचलित पध्दतीनुसार, आरंभीच्या ठोक स्थिर मालमत्तांवरील घसा-या बरोबरच वर्षभरात निर्माण झालेल्या नवीन मालमत्तांवर ५० टक्के घसा-याची तरतुद केली आहे.

व्यवसायिक आराखड्याचा प्रारंभ हा, कंपनीच्या सध्याच्या कार्याची स्थिती, कामगिरी आणि संघटनात्मक रचना कशी आहे या आढाव्याच्या आधारे केला आहे. भविष्यासाठी योजनांची आखणी व्यूव्हरचना करताना कंपनीने ज्या तात्वीक मूल्यांची निष्ठा ठेवली त्या आधारे स्वत:साठी ध्येय तयार केलेली आहेत. असा आराखडा तयार करताना कंपनीची विद्यमान रचना, तिची शक्ती स्थाने व उणीवा, कंपनीची धोरणे आणि नवीन आकारास येणारे कायदेविषयक व औद्योगिक व्यवसायाचे पर्यावरण या सर्व बाबींना महत्वाचे स्थान दिले आहे.

## ४. व्यावसायिक आराखड्याची उद्दिष्टे :

नियामकांच्या मंचाने (Regulators Forum) शिफारस केली आहे की, "अनुज्ञापित धारकांनी त्यांचे व्यावसायिक आराखडा आणि वीज खरेदी आराखडा, बहुवर्षी दर विनंती अर्ज सादर करण्याच्या किमान सहा महिने अगोदर, आयोगास मंजूरीसाठी सादर करावेत". महावितरणने वित्तिय वर्ष २०१३-२०१४ ते २०१५-२०१६ या काळासाठीचा कंपनीचा सर्वकष व्यावसायिक आराखडा विकसित केला आहे व तो खालीलप्रमाणे विभागशः सादर केलेला आहे. त्यात उपनिर्दिष्ट सर्व विषयांचा धोरणात्मक, स्पर्धात्मक, वित्तिय, वाणिज्य व संघटनात्मक दृष्टीकोनातून समावेश केला आहे.

## ५. वायर्स आणि पुरवठा व्यवसायाचे विलगीकरण :

विद्युत अधिनियम २००३ मध्ये वितरण अनुज्ञाप्तीधारकावर वायर्स आणि पुरवठा व्यवसायासाठी लेखा वेगवेगळ्या ठेवण्याची सक्ती करण्याबाबत कोणतीही तरतुद नाही. अशा प्रकारची वेगवेगळी लेखा-पुस्तके - नोंदवह्या कोणत्याही राज्यात आजपावेतो ठेवण्यात आलेल्या नाहीत, यावरुन ही बाब स्पष्ट होते. याशिवाय महावितरण येथे नमूद करते की, कंपनीने सुध्दा वायर्ससाठी आणि पुरवठ्याच्या व्यवहारासाठी वेगवेगळी लेखा पध्दती अनुसरली नाही व तशी वेगळी लेखा पुस्तके जतन केलेली नाहीत. याबाबतीत नवीन संगणक प्रणाली विकसित करण्यात येत आहे व तिचा नियमितपणे वापर करण्यास काही कालावधी लागणार आहे. मात्र काही गृहितांच्या आधारे महावितरणने वायर्स व पुरवठा व्यवसाय यांच्यात झालेल्या खर्चाचे टक्केवारीत गुणोत्तर खालील तक्त्यात मांडले आहे.

| अ.क्र. | तपशील | वायरचा व्यवसायाची टक्केवारी | पुरवठा व्यवसायाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वीज खरेदी खर्च स्थिर आकार | ५% | ९५% |
| २ | वीज खरेदी खर्च परिवर्तनशील आकार | - | १००% |
| ३ | कर्मचारी खर्च | ७५% | २५% |
| ४ | प्रशासन व सामान्य खर्च | ७५% | २५% |
| ५ | दुरुस्ती व देखभाल खर्च | ९५% | ५% |
| ६ | घसारा | ९०% | १०% |
| ७ | दीर्घ मुदतीचे भांडवली कर्जावर व्याज | ९०% | १०% |
| ८ | खेळत्या भांडवलावरील व्याज | १००% | ०% |
| ९ | इतर वित्तीय आकार | ९०% | १०% |
| १० | बुडीत रकमेसाठीची तरतुद | १०% | ९०% |
| ११ | इतर खर्च | ०% | १००% |
| १२ | आयकर | ९०% | १०% |
| १३ | पारेषण अनुज्ञाप्तीधारकास दिलेला पारेषण आकार | - | १००% |

| अ.क्र. | तपशील | वायरचा व्यवसायाची टक्केवारी | पुरवठा व्यवसायाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १४ | आकस्मिक खर्चाच्या राखीव निधीसाठी अंशदान | ९०% | १०% |
| १५ | प्रोत्साहन व सवलती | ०% | १००% |
| १६ | समभाग भांडवलावर परतावा | ९०% | १०% |
| १७ | वीजदरा व्यतिरिक्त संकीर्ण महसूली उत्पन्न | ०% | १००% |
| १८ | व्हिलींग आकारातून मिळालेले उत्पन्न | १००% | ०% |

येथे महावितरण नम्रपणे नमूद करु इच्छिते की, वायर आणि पुरवठ्याचे व्यवहार यांच्या खर्चाच्या विलगीकरणाची टक्केवारी ही पूर्णपणे गृहीतांवर आधारीत आहे. त्याचा वापर लेखा, हिशेबासाठी आधार म्हणून करता येणार नाही. याशिवाय महावितरण नमूद करु इच्छितो की, महावितरण सध्यस्थितीत प्रचलित कार्यपध्दतीने लेखा मांडणी करणार आहे. जेव्हा नवी संगणक प्रणाली स्थापित होऊन योग्य प्रकारे कार्यान्वित होईल, तेव्हा भविष्यात महावितरण वायर्स व पुरवठा व्यवहाराची वेगवेगळी माहिती देऊ शकेल महावितरण ठामपणे स्पष्ट करु इच्छिते की, हे विलगीकरण फक्त व्यवसाय आराखड्यासाठी एकूण महसूलाची गरज निश्चित करणाच्या हेतूने केले आहे.

## ६. कंपनीच्या कार्याची रुपरेषा (Company Profile) :

महावितरण ही कंपनी अधिनियम १९५६ अंतर्गत नोंदणी झालेली कंपनी आहे व कंपनीच्या पुरवठा क्षेत्रात उपभोक्त्यांना /ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी वितरणाची व्यवस्था विकसीत करणे, तिचे संचालन करणे व ती सुव्यवस्थित राखणे यात कार्यरत आहे.

एक अनुज्ञाप्तिधारक म्हणून महावितरण आपल्या प्रत्येक अंतीम उपभोक्त्याला विजेचा पुरवठा करणे / विजेची किरकोळ पध्दतीने (Retail) विक्री करणे आणि त्यासाठी आवश्यक असणारा वायर व्यवसाय सुस्थीतीत ठेवणे हे काम करत आहे.

याशिवाय वीज निर्मितीची क्षमता असलेल्या स्त्रोतांसोबत स्पर्धात्मक पध्दतीने दीर्घ /मध्यम / अल्प मुदतीसाठी करार करणे आणि वीज वितरणाच्या पायाभूत सुविधा विकसित करणे इत्यादी कामेही महावितरणकडून केली जातात. आपली तांत्रिक व वित्तीय कामगिरी राष्ट्रीय मानांकना नुसार करण्यासाठी सतत सुधारणा करणे व त्यासाठी उपलब्ध असणारी सर्वोत्कृष्ट कार्यपध्दती व तंत्रज्ञान आत्मसात करणे हे कार्य सुध्दा महावितरण करीत आहे.

## अ] विजन व मिशन स्टेटमेन्ट (Vision & Mission Statement) :

महावितरण ही देशातील सर्वात मोठी वीज वितरण संस्था आहे. तसेच ती देशातील सर्वोत्कृष्ट वीज वितरण संस्था व्हावी हे कंपनीचे स्वप्न आहे. त्यासाठी कंपनीने आपल्या कार्यासाठी पुढील ध्येय वाक्य निश्चित केले आहे.

"आपल्या उपभेक्त्यांना रास्त दरात, विश्वासार्ह व गुणवत्तापूर्ण सेवा देणारी भारतातील सर्वोत्कृष्ट वीज वितरण कंपनी असे सन्मानस्थान संपादन करणे, राज्याच्या अविरत विकासासाठी आणि एकूण देशाच्या प्रगतीसाठी आपले योगदान देणे".

**मिशन :**

महावितरण कंपनीचे कार्याचे उद्दिष्टे व मिशन यामध्ये पुढील ध्येय नमूद केलेली आहेत.

- आम्ही एक व्यावसायिक कंपनी या नात्याने, आमच्या ग्राहकांना विश्वासार्ह व दर्जेदार वीज पुरवठा योग्य प्रमाणशीर व स्पर्धात्मक दराने सेवा देऊन महाराष्ट्रातील कृषी, औद्योगिक व सर्वांगिण विकासास उंचावण्याच्या ध्येयाने कार्यरत राहु.
- ग्राहकांना उच्च दर्जाचे समाधान मिळावे यासाठी आमची सर्व कार्ये सचोटीपूर्ण व प्रामाणिक पारदर्शक राहतील यासाठी आम्ही बांधील राहू.
- ग्राहकांच्या संपूर्ण लाभांसाठी तंत्रज्ञानातील सर्वोत्कृष्टता व वित्तिय साफल्य संपादन करण्याचे ध्येय बाळगू.
- प्रणाली सुधारणेसाठी आम्ही सतत कठोर परिश्रम घेऊ तसेच प्रतिबंधात्मक देखभाल करण्यावर भर देऊ.
- विजेच्या चोरीला आळा घालण्यासाठी आम्ही कर्तव्य कठोर होऊ.
- विजेच्या बचतीचे उपाय योजण्यास आम्ही प्रोत्साहन व पाठिंबा देऊ तसेच विजेचा पर्याप्त उपयोग होण्यासाठी तिच्या मागणीचे व्यवस्थापन करु.
- जीवनाचा दर्जा सुधारुन आम्ही आमची सामाजिक बांधीलकी पूर्ण करु.

**ध्येय पूर्तीचे मार्ग :**

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामधून वेगळे होताना महावितरणने आपले ध्येय गाठण्यासाठी पुढील दहा कलमी कार्यक्रम निश्चित केला आहे.

- वीज पुरवठ्याचा दर्जा सुधारणे व त्यामधील व्यत्यय कमी करणे
- ग्राहकांची गा-हाणी सोडविण्याची प्रणाली प्रस्थापित करणे.
- वीज वितरणाच्या जाळ्याचे पूर्व नियोजन करणे.
- वितरण प्रणालीतील वीज हानी कमी करणे
- वीज बील वसुलीची कार्यक्षमता वाढविणे.
- प्रत्येक मंडळ (Circle) हे एक नफ्याचे केंद्र करणे
- नवीन तंत्रज्ञानाचा तसेच संगणकाचा जास्तीत जास्त वापर करणे.
- सेवांचा दर्जा सुधारणे
- कर्मचा-यांच्या कल्याणाचे उपक्रम राबविणे
- विजेच्या मागणीचे आणि शिखर मागणीचे व्यवस्थापन

**७. महावितरणची उल्लेखनिय कामगिरी :**

गेल्या ५ वर्षात उपरिनिर्दिष्ट दहा कलमी कार्यक्रम राबवून आर्थिक चांगली कामगिरी संचालन व सुव्यवस्था क्षेत्रात व्हावी, कार्यक्षमता वाढावी आणि ग्राहकांना अधिक समाधान देता यावे या हेतुसाठी अनेक उपक्रम हाती घेण्यात आले. त्यातून महावितरणला पुढील महत्वाच्या क्षेत्रात यश मिळविता आले.

**कृषिपंपाचे ऊर्जीकरण** : महाराष्ट्र राज्यात ३४ लाख कृषीपंप ग्राहक असून ही संख्या देशात सर्वात जास्त आहे. पूर्वी शेतक-यांचे कृषीपंपाचे अर्ज मोठ्या प्रमाणात प्रलंबित होते मात्र महावितरणने पायाभूत सुविधा बळकट केल्यामुळे कृषीपंपाच्या विजेची जोडणी मिळविण्यासाठी शेतक-यांना आता फार काळ वाट पहावी लागत नाही.

**वीज हानी कमी केली** : महावितरणने वितरणातून होणारी वीज हानी कमी केली आहे. वित्तिय वर्ष २००६-२००७ मध्ये २९.५ टक्के एवढी वीज हानी होती ती वित्तिय वर्ष २०११-२०१२ मध्ये १६.३ टक्के इतकी कमी करण्यात महावितरण कंपनी यशस्वी झाली. हे यश मिळविण्यासाठी वीज चोरी

विरोधी मोहिम व विशेष कार्यक्रम, मोठ्या प्रमाणात मिटर्स बदलण्याचा प्रकल्प, ऊर्जा अंकेक्षण अचूक करण्याच्या पध्दती सुरु करणे अशा विविध उपाय योजना करण्यात आल्या.

**८. महावितरणच्या संचालनाच्या कामगिरीची रुपरेषा :**

हस्तांतरण योजनेनुसार महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची पूर्नरचना चार कंपन्यामध्ये झाली महाराष्ट्र शासनाने महावितरण कंपनीकडे महाराष्ट्र राज्यातील वीज वितरण संबंधी सर्व मालमत्ता व दायित्वे सुपूर्द केली. यामध्ये १४ परिमंडळे असून त्यात ३३ केव्ही, २२ केव्ही, ११ केव्ही, कमी दाबाच्या वीजतारा, उपकेंद्रे व संलग्न रचना आहे. अवघ्या तीन वर्षात, महावितरणने वितरण हानी २९.५ टक्क्यावरुन १६.०३ टक्के एवढ्या मोठ्या प्रमाणात कमी करुन दाखविली. तसेच वीज बिलवसुलीची कार्यक्षमता ८९.२ टक्क्यावरुन ९७.३ टक्के अशी सुधारली. तसेच कंपनीचा मासिक महसुल रुपये ११०० कोटीवरुन रुपये ३००० कोटी असा वाढविला. आज राज्यात विजेची मागणी सुमारे १५००० मे.वॅ. असून देशातील कोणत्याही प्रगत राज्यात एवढी वीजेची मागणी नाही.

सध्या महावितरण मुंबई शहर वगळता राज्यात विविध श्रेणीतील २ कोटीपेक्षा जास्त ग्राहकांना वीज पुरविते. वित्तिय वर्ष २०११-२०१२ मध्ये कंपनीचा महसुल सुमारे रुपये ३८,००० कोटी आहे. वीजेचे उत्पादन प्रामुख्याने औष्णिक जल, वायु या स्त्रोतांसोबतच सौर, पवन, ऊसाची चिपाडे, आदि अपारंपारिक स्त्रोतांकडूनही केली जाते. कोयना या महानिर्मितीच्या जल विद्युत प्रकल्पातून वीज मिळविली जाते. तसेच महानिर्मितीचे औष्णिक प्रकल्प या मोठ्या स्त्रोतांतून वीज मिळविली जाते. याशिवाय केंद्रिय क्षेत्रातील प्रकल्प (एनटीपीसी व इतर), रत्नागिरी गॅस पॉवर प्रकल्प येथूनही वीज मिळविली जाते. महावितरणची सध्याची वीज मागणी १३००० मे. वॅ. - १५००० मे.वॅ. या मर्यादेत आहे. तर विजेची उपलब्धता १२००० मे.वॅ.- १४२०० मे.वॅ. इतकीच असते. त्यामुळे सुमारे १०० मे.वॅ. ते ८०० मे.वॅ. एवढा तुटवडा राहतो.

पायाभूत सुविधांबाबत सांगावयाचे झाल्यास, महावितरणच्या वीज जाळ्यात लाखो ट्रन्सफॉर्मर्स आणि ज्यांची लांबी काही लाख किलो मीटर्स होईल. अशा वीज तारा आहेत, हजारो वीज उपकेंद्रे आहेत. महाराष्ट्राच्या एकूण ३.०८ हजार चौरस किलो मीटर्स या भौगोलिक क्षेत्रातील ४१०१५ खेडी आणि ४५७ शहरांना वीज पुरवठा या पायाभूत सुविधांच्या वीजजाळ्याव्दारे केला जातो. महाराष्ट्र राज्यासाठीच्या महावितरणच्या वीज जाळ्यातील ठळक वैशिष्टे खालील तक्त्यात दिली आहेत :

| तपशील | मोजणीचे एकक (युनिट) | ३१ मार्च २०१० रोजी | ३१ मार्च २०११ रोजी | ३१ मार्च २०१२ रोजी |
|---|---|---|---|---|
| **वीज उपकेंद्राची संख्या** | | | | |
| अ) ३३/११ के.व्ही | संख्या | १८४६ | २०२६ | २२६५ |
| ब) ३३/२२ के.व्ही | संख्या | ३१ | ३३ | ४० |
| क) २२/११ के.व्ही | संख्या | ८३ | ८९ | ९८ |
| स्वीचींग स्टेशन्सची (२२ व ११ के.व्ही.) | संख्या | ७३ | ८६ | १११ |
| **उच्च दाबाच्या तारा** | | | | |
| अ) ३३ के.व्ही. जमिनीवरील व भूमिगत | सी.के.टी.-कि.मी. | ३२०४३ | ३४१५१ | ३६८०३ |
| ब) २२ के.व्ही. जमिनीवरील व भूमिगत | सी.के.टी.-कि.मी. | २५६२० | २७५३२ | २८९५८ |
| क) ११ के.व्ही. जमिनीवरील व भूमिगत | सी.के.टी.-कि.मी. | २१३६०९ | २३१४३९ | २४५१४९ |
| **कमी दाबाच्या तारा (४१५ व्होल्ट)** | | | | |
| अ) जमिनी पासून वर असलेल्या (overhead) | कि.मी. | ५१३६२२ | ५३१९८० | ५५०७६२ |
| ब) भूमिगत | कि.मी. | ७८९१ | ८३६७ | ९१५१ |
| **पॉवर ट्रान्सफॉमर्स** | | | | |
| एकूण स्थापित केलेले | संख्या / नग | ३१८६ | ३६१३ | ४०५० |
| स्थापित क्षमता | एम.व्ही.ए. | १६३८९ | १९०३२ | २१८३७ |
| **डिस्ट्रीब्युशन ट्रान्सफॉमर्स** | | | | |
| एकूण स्थापित केलेले | संख्या / नग | ३५१२४३ | ३९१५७४ | ४३९६५३ |
| स्थापित क्षमता | एम.व्ही.ए. | ३२६९७ | ३६१८६ | ४०३५६ |

## ९. प्रवर्तनातील कामगिरी (Operational Performance) :

### अ) विजेची मागणी व पुरवठा यांचे विश्लेषण

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती क्षमता यामध्ये भर करीत आहे तसेच या जादा विजेचे पारेषण व वितरण करण्यासाठी पायाभूत सुविधा सुध्दा बळकट करीत आहे. गेल्या ४-५ वर्षात या विषयीच्या कृती कार्यक्रमामुळे योग्य परिणाम आता दिसून येत आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्याची वाटचाल भार नियमन मुक्त राज्य या दिशेने होत आहे.

शिखर मागणीच्या वेळी मागणी - पुरवठा यांची स्थिती (मे.वॅ.)

| तपशील | वित्तिय वर्ष २००६ | वित्तिय वर्ष २००७ | वित्तिय वर्ष २००८ | वित्तिय वर्ष २००९ | वित्तिय वर्ष २०१० | वित्तिय वर्ष २०११ | वित्तिय वर्ष २०१२ | * वित्तिय वर्ष २०१३ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मागणी | १३२९० | १४२५२ | १३९३४ | १३२७२ | १३६६२ | १४०४७ | १४९३१ | १४७६० |
| उपलब्धता | ९२१२ | ९६३८ | १०१३० | १०२०३ | १०९१९ | ११९१७ | १२८४१ | १३१७३ |
| **तुट** | **४०७८** | **४६१४** | **३८०४** | **३०६९** | **२७४३** | **२१३०** | **२०९०** | **१५८७** |

* ऑक्टोंबर २०१२ पर्यंत

## ब) विजेची विक्री

वित्तीय वर्ष २००५-२००६ ते वित्तीय वर्ष २०११-२०१२ या कालावधीत लघु दाबाच्या (L.T.) व उच्च दाबाच्या (H.T.) ग्राहकांची श्रेणीनुसार सारांश रुपात माहिती (आकडेवारी) खालील तक्त्यात दिली आहे. पाच वर्षाच्या कालावधीत उच्च दाबाच्या श्रेणीतील ग्राहकांची संख्या ५ टक्क्याने वाढली तर त्याच कालावधीत कमी दाबाच्या ग्राहकांची संख्या १६ टक्क्याने वाढली.

उच्च व कमी दाब श्रेणीच्या विजेच्या ग्राहकांना केलेली वीज विक्री :


**(दशलक्ष युनिट)**

| तपशील | वित्तिय वर्ष २००६ | वित्तिय वर्ष २००७ | वित्तिय वर्ष २००८ | वित्तिय वर्ष २००९ | वित्तिय वर्ष २०१० | वित्तिय वर्ष २०११ | वित्तिय वर्ष २०१२ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उच्च दाबाची | २३,९९९ | २४,४७७ | २५,८५२ | २६,२८५ | २७,६०७ | २९,५०० | ३०,३६७ |
| लघु दाबाची | २६,७६६ | २४,६६९ | २९,०३३ | ३१,८८७ | ३४,५९६ | ३६,५३४ | ४४,१७६ |
| **एकूण** | **५०,७६५** | **४९,१४६** | **५४,८८५** | **५८,१७२** | **६२,२०३** | **६६,०३४** | **७४,५४४** |

## ब) वितरण हानी :

महावितरण कंपनीसाठीच्या वितरण हानीचा वर्ष निहाय तपशील खाली (आलेखात) दाखविला आहे. आरंभी वीज हानी कमी करण्याच्या प्रयत्नांना अपेक्षित यश मिळत नव्हते. मात्र आता हे प्रयत्न चांगल्याप्रकारे प्रभावी ठरत असल्याचे वितित्तय वर्ष २०११ पासूनच दिसून आले आहे. आधीच्या काळात मोठ्या प्रमाणात वीज हानी होण्याचे महत्वाचे कारण म्हणजे वीज जाळ्याच्या यंत्रणेवर अतिरिक्त भार होता व ही यंत्रणा कालानुरुप जुनी / खराब झाली होती. त्यामुळे तांत्रिक हानी मोठ्या प्रमाणावर होत असे.

**वितरण हानी**




## ड) विज खरेदी खर्च :

महावितरणने आपल्या ग्राहकांना वीज पुरविण्यासाठी विजेच्या विविध पुरवठादार / स्त्रोतांसोबत करार केलेले आहेत. महावितरण प्रामुख्याने राज्यातील वीज निर्मिती केंद्र यांच्यावर मूळ-भार पूर्ण करण्यासाठी अवलंबून आहे. शिखर मागणीच्या वेळीची मागणी पूर्ण करण्याकरिता

महावितरणने अल्प मुदतीच्या वीज व्यापा-यांसोबत करार केले आहे. तसेच देशातील वीज तुटवड्याच्या परिस्थितीचा फायदा घेवून सर्वात महाग दराने वीज विकणा-या यु.आय. आणि आय.बी.एस.एम. यांच्याकडूनही काही वीज घ्यावी लागते. गेल्या सहा वर्षात विविध स्त्रोतांकडून मिळविलेली वीज, सरासरी दशलक्ष वीज युनिट्ची टक्केवारी आणि सरासरी खर्च खालील तक्त्यात दाखविला आहे.

| विजेचा स्त्रोत | सरासरी (टक्केवारी) | |
|---|---|---|
| | प्रमाण (Quantum) | रक्कम (Amt.) |
| महानिर्मिती ( MSPGCL) | ५६ | ४९ |
| एन.टी.पी.सी. | २३ | १९ |
| एन.पी.सी.आय.एल. | ०४ | ०४ |
| जलविद्युत | ०१ | ०१ |
| आर.जी.पी.सी.एल. (रत्नागिरी कंपनी) | ०८ | १३ |
| खासगी व्यापारी व इतर | ०४ | ०८ |
| यु. आय. व आय. बी. एस. एम. | ०१ | ०१ |
| एन.सी.ई. व सी.पी.पी. | ०३ | ०५ |
| **एकूण :** | **१०० टक्के** | **१०० टक्के** |

**इ) देयकाच्या रकमेतून सवलतीसाठी मिळालेली रक्कम :**

महावितरण आपल्या ग्राहकास मा. आयोगाने निश्चित केलेल्या दराने विजेचे देयक देते महाराष्ट्र शासन काही श्रेणीतील ग्राहकासाठी वीज बीलामध्ये सवलत देते. त्यातून विशिष्ट श्रेणीतील ग्राहकांना त्यांच्या देयकाच्या रक्कमेत काही सवलत दिली जाते. खालील तक्त्यात अशा विशिष्ट श्रेणीतील ग्राहकांच्या देयकाच्या रक्कमेसाठी प्राप्त झालेल्या रक्कमेची विभागणी (Break up) दिली आहे. पूर्वी राज्यात कृषीपंप ग्राहकांना वीज पुरवठा त्याचा काहीही मोबदला न घेता देण्यात येत असे. या धोरणात दिनांक ०१ जून २००५ पासून बदल झाला आहे. मात्र शेती पंप व यंत्रमाग (Power Loom) यांना सवलतीची वीज विक्री करणे चालू आहे. महाराष्ट्र शासना तर्फे काही विशिष्ट ग्राहक वर्गाला महसुल आधाराचा तपशील पुढील तक्त्यात दिला आहे.

**(रु. कोटीत)**

| तपशील | वित्तीय वर्ष २००७ | वित्तीय वर्ष २००८ | वित्तीय वर्ष २००९ | वित्तीय वर्ष २०१० | वित्तीय वर्ष २०११ | वित्तीय वर्ष २०१२ |
|---|---|---|---|---|---|---|
| कृषी | १,२२९ | १,३०५ | १,३९७ | १,८६५ | २,१३९ | ३,१११ |
| यंत्रमाग | ४८४ | ४७१ | ४८६ | ४५८ | ७५४ | ९४६ |

**फ) महावितरणचे कार्याचे निर्देशांक :**

अशा निर्देशाकांचे प्रगणन करण्याच्या मुळ हेतू हा एक सुयोग्य प्रणाली विकसित करणे हा आहे. त्यांचा दहा कलमी कृती आराखडा (Ten point action plan) अति महत्वपूर्ण कामगिरीचे निर्देशकांपैकी एक (Key Key Performance Indicator [KKPIs]) असे त्यांना विनिदेर्शित केले आहे. याबाबतीत महावितरणची पूर्वीच्या काळातील कामगिरीची ठळक वैशिष्ठ्ये खालीलप्रमाणे आहेत.

| विश्वासार्हता निर्देशांक | वित्तीय वर्ष २००८ | वित्तीय वर्ष २००९ | वित्तीय वर्ष २०१० | वित्तीय वर्ष २०११ | वित्तीय वर्ष २०१२ |
|---|---|---|---|---|---|
| SAIFI (संख्या) | १२.०७ | १०.८४ | १२.२८ | १७.५९ | २५.०४ |
| SAIDI (Minutes) | ३८६.५१ | २४३.२० | ३०७.१९ | ९०.२६ | ८२.६२ |
| CAIDI (Minutes) | ३२.०१ | २२.४३ | २५.०१ | ५.१३ | ३.३० |

**१०.वित्तीय कामगिरी :**

महावितरणचे महसूलाचे विवरणपत्र आणि ताळेबंद याचे विश्लेषण केल्यानंतर, असे दिसून येईल की शासकीय अनुदान, तसेच इतर स्तोत्रांपासून उत्पन्न यावरील अवलंबीत कमीत-कमी होत आहे. सहावा वेतन आयोग आणि दुरुस्ती व देखभाल (R&M) कार्यामुळे संचालन व सुव्यवस्था खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

महावितरणने वीज पुरवठ्याचा दर्जा सुधारावा म्हणून वितरणाच्या महत्वाच्या पायाभूत सुविधांचा विकासांची योजना अंमलात आणली. यामुळे आणि तसेच नुतनीकरण व आधुनिकीकरण यामुळे कंपनीच्या निव्वळ स्थावर मालमत्ता २१ टक्के (सीएजीआरच्या) अशा वाढल्या. स्थावर मालमत्ता ३३ टक्क्यापर्यंत वाढल्या आहेत तसेच महावितरणने वीज वितरणांसाठी ज्या महत्वाच्या पायाभूत सुविधा वाढविल्या त्या आता भांडवलीकरण करण्याच्या टप्प्यात आहेत. असे या वाढीवरुन दिसून येते. महावितरणने गेल्या २ वर्षात सुमारे रु. ३७,००० कोटीचे भांडवलीकरण करण्याची कृती पार पाडली आहे. महावितरणने भांडवली खर्चाची (Capex) योजना हाती घेतली आहे. ज्यात ग्राहकांसाठी वीज पुरवठ्याची गुणवत्ता वाढविणे, त्याची उपलब्धता व सुरक्षितता वाढविणे या उद्दिष्टाने वीज वितरण यंत्रणा अधिक बळकट करण्याच्या कामांचा समावेश आहे. तसेच सतत वाढत जाणारा वीज भार (Load) पूर्ण करण्यासाठी वीज प्रणालीचा विकास करणे, प्रणालीतील हानी कमी करण्याचे उद्दिष्ट निश्चित करुन ते पूर्ण करणे, ग्राहकांना दिल्या जाणा-या सेवेचा दर्जा उंचावण्यासाठी स्वंयचलन (यांत्रिकीकरण) व इतर सुधारणांची कामे करणे आणि जेथे वीज पोहोचली नाही अशा क्षेत्रात वीज

पुरवून सामाजिक जबाबदारी पूर्ण करणे अशा विविध उद्दिष्टांच्या कामाचाही अंतर्भाव या योजनांमध्ये होतो.

कर्ज - समभाग यांचे गुणोत्तर वित्तीय वर्ष २००७-०८ मध्ये ०.७८ असे होते ते वित्तीय वर्ष २००८-०९ मध्ये ०.६७ इतके कमी केले. या काळात भागधारकांचा निधी दीर्घ मुदतीच्या दायित्वांपेक्षा जास्त दराने वाढला. परिणामी हे गुणोत्तर कमी झाले होते. मात्र वर्ष २००९-२०१० पासून परिस्थिती उलटी झाली आहे आणि आता दीर्घ मुदतीची दायित्वे तुलनेने उच्च दराने वाढत आहे.

**११. विज क्षेत्राचे चित्र :**

भारतीय अर्थव्यवस्था गेल्या तीन वर्षात ९ टक्क्यापेक्षा अधिक दराने वाढत आहे. यामुळे अर्थव्यवस्थेतील उत्पादन व सेवा यासाठी लागणा-या विजेवरचे अवलंबीत्वही मोठ्या प्रमाणात वाढत आहे. विकसीत होणा-या अर्थव्यवस्थेमुळे विजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मात्र देशातील विजेची सध्याची उपलब्ध क्षमता या वाढत्या मागणीला पूर्ण करण्याइतकी पुरेशी नाही. परिणामी शिखर मागणी व ऊर्जा उपलब्धता यात तूट आहे. विजेची मागणी वाढली आहे. तसेच दरडोई १००० युनीट एवढा वीज वापर करण्याची राष्ट्रीय योजना आहे. त्यासाठी भारत सरकारने ११ व्या योजनेत १००,००० मे.वॅ. एवढी नवीन वीज क्षमता वाढविण्याचे महत्वाकांक्षी लक्ष्य ठेवले आहे.

देशाच्या एकूण वीजनिर्मितीपैकी पश्चिम क्षेत्रात ३२ टक्के वीज निर्माण होते. तसेच पश्चिम क्षेत्रातील वीजेची तूट सुध्दा देशात सर्वात जास्त आहे. वित्तीय वर्ष २००९-१० मध्ये पश्चिम क्षेत्रात वीजेची सुमारे १८ टक्के टंचाई होती. देशातील वीजेची मागणी व पुरवठा याची स्थिती खालील तक्त्यात दिली आहे.

| क्षेत्र | विजेची गरज (द.ल.युनीट) | तूटीची टक्केवारी | शिखर मागणी (द.ल.युनीट) | तूटीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| उत्तर | २,५४,२३१ | १२% | ३७,१५९ | १५% |
| पश्चिम | २,५८,५२८ | १४% | ३९,६०९ | १८% |
| दक्षिण | २,२०,५७६ | ६% | ३२,१७८ | १०% |
| पूर्व | ८७,९२७ | ४% | १३,२२० | १८% |
| **संपूर्ण भारत** | **८,३०,५९४** | **१०%** | **१,२३,९२६** | **१३%** |

**संदर्भ** *केंद्रीय वीज प्राधिकरणाचा मासिक वीज पुरवठा स्थितीच्या अहवालातील माहिती*

गतकाळापासून राज्यातील शिखर मागणी व शिखर (पुरवठा) यात तसेच एकूण ऊर्जेच्या संदर्भात सातत्याने तूटीची परिस्थिती आहे. राज्यातील प्रत्यक्ष वीज पुरवठ्याची स्थिती गेल्या काही वर्षापासून कशी आहे हे खालील तक्त्यावरुन दिसून येईल.

| कालावधी | शिखर मागणी (मे.वॅ.) | शिखर पूर्तता(मे.वॅ.) | शिखर तूट/अधिक्य (मे.वॅ.) | शिखर तूट/अधिक्य (टक्के) |
|---|---|---|---|---|
| २००२-०३ | ११,४२५ | ९,००४ | २,४२१ | २१.१९ |
| २००३-०४ | ११,३५७ | ९,३१५ | २,०४२ | १७.९८ |
| २००४-०५ | १२,७४९ | ९,७०४ | ३,०४५ | २३.८८ |
| २००५-०६ | १३,२९० | ९,२१२ | ४,०७८ | ३०.६८ |
| २००६-०७ | १४,२५२ | ९,६३८ | ४,६१४ | ३२.३७ |
| २००७-०८ | १३,९३४ | १०,१३० | ३,८०४ | २७.३० |
| २००८-०९ | १३,२७२ | १०,२०३ | ३,०६९ | २३.१२ |
| २००९-१० | १३,६६२ | १०,९१९ | २,७४३ | २०.०८ |
| २०१०-११ | १४,०४७ | ११,९१७ | २,१३० | १५.१६ |
| २०११-१२ | १४,९३१ | १२,८४१ | २,०९० | १४.०० |
| **२०१२-१३ (ऑक्टोंबर २०१२ पर्यंत)** | **१४,७६०** | **१३,१७३** | **१,५८१** | **१०.७१** |

महावितरणची सध्याची शिखर मागणी सुमारे १३००० मे.वॅ. आहे. मात्र विजेची उपलब्धता सुमारे १२००० ते १४२०० मे.वॅ. इतकी आहे. म्हणजेच महावितरणला १००-८०० मे.वॅ. एवढ्या विजेची कमतरता आहे. ती पूर्ण करण्यासाठी महावितरणचा इतर स्त्रोतांकडून पारदर्शक स्पर्धात्मक दराने व वीज व्यापा-याकडून प्रचलीत बाजार भावाने मिळविण्याचा प्रस्ताव आहे.

## १२. नियामक आकृतीबंध

### अ) राष्ट्रीय स्तर

विद्युत अधिनियम २००३ (विद्युत कायदा-२००३) हा अमलात आल्यापासून विजेच्या बाजारपेठेत खूपच मोठे बदल झाले आहेत. वितरण कंपनीच्या कार्यपध्दतीवर झालेले मोठे परिणाम खालीलप्रमाणे आहेत.

- वीज निर्मितीची परवाना पध्दती नाहीशी झाली.
- ग्रामीण विद्युतीकरण पूर्ण करण्यावर भर तसेच ग्रामीण वीज वितरणाचे काम पंचायती, सहकारी संस्था, बिगर सहकारी संस्था, फ्रँचाइझी यांचेकडे सोपविण्याचा आग्रह.
- ग्रामीण क्षेत्रात कोणत्याही परवान्याशिवाय वीजनिर्मिती व वितरण करण्याची तरतूद
- पारेषण व वितरणात खुला प्रवेश सुरु
- समांतर परवाना पध्दती सुरु - एका क्षेत्रात एक मात्र वीज वितरणाचा परवाना ठेवण्याची व्यवस्था बंद केली.
- राज्य वीज नियामक आयोगाची स्थापना बंधनकारक करण्यात आली.
- वीज प्रणालीतील चोरी व हानी या समस्या.

वीज अधिनियम-२००३ मधील वरती नमूद केलेल्या तरतूदींमुळे वीज क्षेत्रावर दुरगामी परिणाम झ ाालेले आहेत. या विद्युत अधिनियम-२००३ व्दारे दीर्घकाळात स्पर्धा असलेले वीज क्षेत्र निर्माण करण्याचा उद्देश असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे राज्यातील जनतेची विजेची गरज भागविणा-या वीज संस्थांना आता बाजारपेठेत येणा-या इतर संस्थांशी स्पर्धा करण्याकरीता त्याची कामगिरी सुधारण्याशिवाय अन्य पर्याय नाही.

विद्युत अधिनियम-२००३ याच्याशी सुसंगत असे राष्ट्रीय वीज धोरण असून त्यात ग्रामीण विद्युतीकरणाची योजना, वीजजिर्मिती क्षमता वाढविणे, स्वच्छ पर्यावरणासाठी वीज निर्मितीत योग्य अशी संमिश्रता आणणे, चांगल्या पारेषण व वितरण व्यवस्थेसाठी वीज जाळयात सुधारणा करणे आदि बाबी समाविष्ट आहेत. तसेच अत्यंत कार्यक्षम असे अद्ययावत तंत्रज्ञान वापरणे व संशोधन व विकासासाठी जादा निधी उपलब्ध करणे याचा त्यात अंतर्भाव केला आहे. या धोरणात संवर्धन व विजेच्या मागणीच्या बाजूचे व्यवस्थापन करणे व राष्ट्रीय स्तरावर याबाबतीत जागरुकता निर्माण करण्याच्या कार्यक्रमावरही भर देण्यात आला आहे. यामुळे वीज वितरण कंपन्यांना स्पर्धा करताना या राष्ट्रीय धोरणातील मार्गदर्शक तत्वाचे बंधनही पाळावे लागणार आहे. ग्राहकांचे हितसंबंधाचे रक्षण करणे, कार्यक्षमता वाढविणे, वीज क्षेत्रात वित्तीय उपलब्धता वाढविणे तसेच वीज उपलब्धता वाढविणे अशी उद्दिष्टे या धोरणात आहेत.

राष्ट्रीय वीज दर धोरणात वीज दर निश्चितीसाठी विविध मापदंड दिलेले आहेत. त्यात विजनिर्मिती व पुरवठ्याच्या गुंतवणूकीवर पुरेसा परतावा मिळण्यासाठी तरतूद करणे आणि त्याचबरोबर ग्राहकांना योग्य व रास्त असा दर लावण्याची हमी देणे अशा बाबी समाविष्ट आहेत. या धोरणाव्दारे राज्य वीज नियामक आयोगांनाही संस्थांचे वीज दर निश्चित करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे देण्यात आली आहेत. या धोरणात नमूद करण्यात आले आहे की, भविष्यात वीज मंत्रालयाने दिनांक ०५ जानेवारी, २०११ पासून लागू केलेल्या अलीकडच्या मार्गदर्शक सूत्राप्रमाणे वीज वितरणाच्या परवानाधारक संस्थांना फक्त स्पर्धात्मक बोली पध्दतीनेच वीज खरेदी करता येईल.

## १३. SWOT अर्थात शक्तीस्थाने दुर्बलस्थाने संधी व धोके यांचे विश्लेषण :

कोणत्याही कंपनीने आपल्या व्यवसायाचा आराखडा योजना करताना स्वतःची अंतर्गत शक्तीस्थाने व दुर्बलस्थाने कोणती हे ओळखणे व बाहेरच्या वातावरणात असणा-या संधी व धोके यांचे नेमके मुल्यमापन करणे आवश्यक असते. याप्रकारे अंतर्गत व बाह्य अशा दोन्ही क्षेत्रातील वातावरणाचे

नेमके मुल्यमापन करुन त्यानुसार आपल्या कंपनीच्या विकासाचा मार्ग आखता येतो. महावितरणसाठीचे हे विश्लेषण खालीलप्रमाणे केले आहे.

| | **उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी सहाय्यक बाबी** | **उद्दिष्टेपूर्तीत हानीकारक बाबी** |
|---|---|---|
| **अंतर्गत मूळ बाबी- संस्थेच्या संबंधित** | ✓ अनुभवी मनुष्यबळ<br>✓ तांत्रिक नैपुण्य<br>✓ सर्वात मोठी वितरण कंपनी<br>✓ विक्रीची निरोगी वाढ<br>✓ कामगिरी सुधारण्याचे अभिनव मार्ग<br>✓ राज्यव्यापक मोठे वीज जाळे | ✓ नियामक तरतुदीची अनिश्चितता<br>✓ नियामक आयोगाचे आदेश मिळण्यास होणारा विलंब<br>✓ आवश्यक, वैध खर्च हिशोबात न धरणे<br>✓ राज्य विज नियामक आयोगांच्या आदेशांत अपिलिय प्राधिकरणाव्दारे सुधारणा होणे अथवा सदर आदेश रद्द करणे.<br>✓ खर्च वसूल होतील असे दर नसणे |
| | **संधी** | **धोके** |
| **बाह्यस्त्रोतातील बाबी परिस्थितीस संबंधित** | ✓ संयुक्त उपक्रम सुरु करणे (Jt. Ventures)<br>✓ वितरणाच्या फ्रॅन्चायजी देणे<br>✓ अपारंपारिक ऊर्जा वापरणे<br>✓ विजेची बाजारपेठ विकसीत करणे<br>✓ सीडीएम लाभ<br>✓ सहाय्यक सेवा<br>✓ पायाभूत सेवांचा दर्जा उंचावणे<br>✓ भाराचे व्यवस्थापन<br>✓ स्पर्धात्मक बोली | ✓ भेदभाव रहीत खूला प्रवेश (ओपन एक्सेस) बंधनकारक.<br>✓ समांतर परवानाधारक - प्रवेश करु शकतात<br>✓ नियमनातील धोके व त्यातील सातत्याचा अभाव<br>✓ विशेष आर्थिक क्षेत्र विकासक (SEZ) यांना व शहरांना अभिमत परवाने Deemed license.<br>✓ कार्यातील बदला विषयी खूप संवेदनशील स्थिती |

## १४. बाजारपेठेतील समस्या आणि आव्हाने :

वीज वितरणाच्या व्यवहारात अनिश्चिता निर्माण करतील अशी अनेक बाजारपेठ संबंधित समस्या व आव्हाने आहेत. म्हणून त्यांची योग्य प्रतिकाराची उपाययोजना असणे गरजेचे आहे. वीज वितरण व्यवहाराची परिस्थिती ब-याच वेळी बाजारपेठेत अतिशय तीव्र समस्या व आव्हाने उभी करते. त्याच्यासाठी महावितरण कंपनीला परिस्थितीचे योग्य मूल्यमापन करुन सामना करावा लागतो. त्याचा विचार करणे आवश्यक आहे.

**खुला प्रवेश (ओपन एक्सेस) :** विज वितरणासाठी कंपनीच्या क्षेत्रात इतर परवानाधारकांना खुला प्रवेश कोणताही भेदभाव न करता देणे आता बंधनकारक आहे. त्यामुळे उच्च दराने विज बिल भरणा करणारे ग्राहक (subsidizing consumers) इतर कंपन्याकडे जाण्याचा धोका संभवतो .

**समांतर परवाने :** वीज कायदा २००३ नुसार कोणत्याही क्षेत्रात अन्य एका समांतर परवानाधारक कंपनीला वीज वितरणाचे काम देता येईल. त्यामुळे एकाच विशिष्ट क्षेत्रात दोन

परवानाधारककंपनीला वितरणाचे काम देता येईल. अलीकडेच केंद्रिय वीज मंत्रालय व वाणिज्य मंत्रालयाने दिलेल्या स्पष्टीकरणामुळे जेथे यापूर्वी वितरण कंपनी वीज पुरवित आहे अशा विशेष आर्थिक परिक्षेत्रात (SEZ). आता त्या एस.इ.झेड - परिक्षेत्राच्या (विकासकाला) वीज वितरणाचा परवानाधारक करण्यात आले. तसेच कंपनीच्या विशिष्ट अधिकार क्षेत्रात आता इतर कंपन्यांनाही वीज वितरणाचा परवाना मिळू शकतो. जेथे वीज हानी व तोटा कमी आहे व कृषी ग्राहकांचे अस्तित्व नाही अशा शहरी भागात अशा एकापेक्षा जास्त परवानाधारकांचे कार्य चालू झाल्याचे दिसून येते.

**नियमकांच्या तरतुदी :** वीज वितरण कंपनीला वीज क्षेत्रात नियामक आयोगाच्या अस्तीत्वामुळे संबंधीत वीज नियामक आयोगाने लागू केलेल्या नियमांचा आकृतीबंध व आदेश या मर्यादेत आपले काम करावे लागते.

**औद्योगिक व स्पर्धेचे धोके** : वीज क्षेत्र स्पर्धेसाठी खुले केल्यामुळे इतर खाजगी क्षेत्रातील वीज निर्माते/ पुरवठादार या क्षेत्रात येऊन स्पर्धा करु लागल्याने उच्च दराने विज बिल भरणा करणारे ग्राहक (subsidizing consumers) इतर कंपन्याकडे जाण्याचा धोका असतो.

**वित्तीय संसाधनांची टंचाई** : गेल्या पाच वर्षात महावितरणची संचित तूट रु. ३८०० कोटीपेक्षा जास्त झाली आहे व कंपनीला अत्यंत अवघड वित्तीय समस्येला तोंड द्यावे लागत आहे. त्यातच विजेचे दर कमी असणे, दराचे आदेश विलंबाने मिळणे, मागील काळातील महसूल तुटीचे पुनरावलोकन व त्याची मंजुरी प्रलंबित असणे आदि कारणामुळे खेळत्या भांडवलाची गरज वाढत आहे. त्यामुळे सद्य परिस्थितीत महावितरणला खर्च वसूल करणे तसेच रिर्टन ऑन इक्विटी या आव्हानांशी सामना करावा लागत आहे.

**अपारंपारिक वीजेची खरेदी करणे बंधनकारक असणे. -**

वीजेची पूननिर्मिर्ती करणा-या स्त्रोतांकडून, वीज खरेदी करण्याचे बंधन राज्य नियामक आयोगांनी वीज वितरणाच्या परवाना धारकांवर घातले आहे. वितरण परवान्याच्या क्षेत्रातील एकूण वीज वापरातील काही टक्केवारी इतकी वीज या स्त्रोतांकडून खरेदी करावी लागते. पुर्नवापरा योग्य ऊर्जा निर्मितीस प्रोत्साहन मिळावे व पर्यावरणावर वीज निर्मितीचा परिणाम कमी प्रमाणात व्हावा यासाठी ही उपाययोजना करण्यातआली आहे.

**वीज मागणीच्या व्यवस्थापनाचे परिणाम :**

वीज ग्राहकांना वीज वापर कार्यक्षमतेने करता यावा यासाठी विजेच्या मागणीचे व्यवस्थापन (DSM) करण्यावर भर दिला जातो. यामध्ये ग्राहकांनी वीजेच्या मागणीची वेळ व स्तर या नुसार त्यांच्या विजेच्या वापराच्या पध्दतीत बदल करावा. त्या दृष्टीने कंपनीच्या कामाचे नियोजन, अंमलबजावणी व निरिक्षण करण्यात यावे आदि कृती अपेक्षित आहेत. प्रत्येक वीज वितरण कंपनीच्या दैनंदिन कामात मागणीचे व्यवस्थापन (DSM) अमलात आणणे आवश्यक झालेले आहे. बहुसंख्य वितरण कंपन्या आणि राज्य वीज नियामक आयोगानी यापूर्वीच मागणीच्या व्यवस्थापनाचे कार्यक्रम सुरु केलेले आहेत. हे कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी वितरण कंपनीच्या कर्मचा-यांचे कौशल्य व कंपनी व्यवस्थापना कडून अशा कार्यक्रमास प्राधान्य देणे आवश्यक आहे असे अनुभवावरुन लक्षात आले आहे. विजेच्या मागणीचे व्यवस्थापन करण्याकरिता विचारपूर्वक प्रोत्साहन दिल्यास व निश्चित उद्दिष्टे ठेवल्यास वीज भाराच्या बदल घडविणे शक्य होईल.

**आंतरराज्य ABT अंमलबजावणी व UI लागू होणे :**

वेळा पत्रकात (schedule) बदल झाल्याने आंतरराज्य स्तरावरील UI आणि वास्तविक यासाठी प्रत्येक वितरण कंपनी जबाबदार आहे. कार्यक्षम वितरण प्रणालीसाठी योग्य नियोजन करणे, विजेचे वितरण करणे व स्काडा - याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

**सेवेचा खर्च विरुध्द सरासरी वसूली :**

विद्युत कायदा-२००३ व त्यानंतरची विविध धोरणे यानुसार आता अंतर्गत अर्थ सहाय्य (Cross Subsidy) हळू हळू कमी करावा व राज्यातील वीज दर "पुरवठ्याचा खर्च" याप्रमाणे करावेत असे बंधन वीज कंपन्यांवर आहे. ग्राहकांसाठीचे दर आता वीज पुरवठ्याच्या खर्चाच्या दिशेने करुन ग्राहकांच्या श्रेण्यांमध्ये दिले जाणारे अंतर्गत अनुदान (Cross Subsidy) कमी करण्याची आवश्यकता आहे. भारतातील सर्वच वितरण कंपन्यांना असे करावे लागणार आहे. त्यांच्यापुढे आणि राज्य वीज नियामक आयोगांपुढे हे मोठे आव्हान आहे.

**बाजारपेठेत व सेवा क्षेत्रात शिरकाव :**

वीज वितरणाचे व्यापक झालेले जाळे आणि अशा पायाभूत सुविधांचा कुणालाही वापर करता येण्याची शक्यता या दोन महत्वाच्या भेदभाव दर्शक बाबी परवानाधारक वितरण कंपनीचे बाजारपेठेतील स्थान निश्चित करतील.

**कामगिरीची मानके (SOPs)**

यापूढे विद्युत पुरवठा करणारी परवानाधारक कंपनी ही ग्राहकांना उत्तरदायी असलेली एकमेव संस्था असणार आहे म्हणून ग्राहक सेवेसाठी निश्चित केलेल्या कामगिरींच्या मानकांनुसार तिला काम करावयाचे आहे. ही मानके म्हणजे वीज पुरवठा देण्यासाठी निश्चित केलेल्या मुदतीत वीज पुरवठा करणे. वीज पुरवठ्याच्या गुणवत्तेची मानके (म्हणजे स्थीर व्होल्टता प्रणाली सुसंवादी असणे) यांचे पालन करणे प्रणाली व्यवस्थित ठेवणे, पुरवठा वेळेत पूर्ववत करणे, मिटर जळल्यास त्याचे पूर्नस्थापन वेळेत करणे, थकबाकी भरल्यावर पूनर्जोडणी करणे ही सर्व कार्ये त्यासाठी निश्चित केलेल्या कालमर्यादेत पूर्ण करावी लागतील. वीजतारा उपलब्धता कोणताही भेदभाव न करता करुन देण्यासाठी, वहनाचा आकार (Wheeling charges) घेणा-या कंपनीला आपले स्वतःचे ग्राहक आणि ज्यांनी त्यांची कंपनी बदलली आहे असे ग्राहक यांच्यात कोणताही भेदभाव करता येणार नाही.

**भविष्यातील बाजारपेठेतील कार्य व वित्तीय स्थिती**

भविष्यातील मूल्यमापन हे उद्योग व्यवसायाच्या पर्यावरण व परिस्थिती याच्या आधारे केले जाईल. यामध्ये नियमकांची भूमिका व पवित्रा, बाजारातील बदलणारी स्थिती व तेथील अटी, विविध श्रेणीतील ग्राहकांच्या वाढीची वेगवेगळा भेददर्शी (Differental) गती, वीजदराचे स्तर आणि त्यांच्या वृध्दीची दिशा, या बाबी समाविष्ट आहेत. वित्तीय प्रक्षेप/अंदाज व कार्यपालन करीता या सर्व बाबी विचारात घ्याव्या लागतील.

**१५. धोका - विश्लेषण व शासनाच्या योजना**

व्यवसाय करतांना त्यामध्ये असणा-या धोका /जोखीम यांचे योग्य आकलन करणे गरजेचे असते. सर्वच संस्था अस्तित्व टिकविण्यासाठी झगडत असतात. आपले हितसंबंधी - यात राज्यशासन, वीज नियामक आयोग, ग्राहक, वित्तीय संस्था इत्यादी या सर्वांसाठी मूल्य निर्मिती करण्यासाठी सर्व संस्था सतत संघर्ष करीत असतात. यामध्ये वित्तीय धोके, नियमना विषयीचे धोके, कार्य करतांना होणारे धोके, तंत्रज्ञानातून उत्पन्न होणारे धोके आदि वेगवेगळ्या प्रकारचे धोके ओळखून-शोधून ते कमी करण्याच्या योजना तयार ठेवाव्या लागतात.

**अ) वीज टंचाई कमी करणे :**

महावितरण कंपनीस सतत भेडसावणारी मोठी समस्या म्हणजे आपल्या ग्राहकांची मागणी पूर्ण करता येईल एवढी वीज त्याप्रमाणात उपलब्ध नसणे ही आहे. महावितरण कंपनीच्या परवाना

प्राप्त क्षेत्रात शिखर मागणीच्या वेळी सुमारे १०० ते ८०० मे.वॅ. एवढी तूट आहे. मात्र भविष्यात महावितरणकडे मागणीपेक्षा जास्त वीज उपलब्ध होऊ शकेल.

**ब) कार्यक्षमता सुधारणे :**

वितरणाच्या क्षेत्रात स्पर्धात्मक वृत्तीने काम करण्यासाठी महावितरण कंपनीला आपल्या कार्यातील कार्यक्षमता वाढवावी लागणार आहे. या करिता हानी व तोटे कमी करणे, वीज पुरवठ्याची गुणवत्ता टिकविणे व वीज जाळ्याचा दर्जा व क्षमता वाढविणे इत्यादी कामे करावी लागतील.

**क) ग्राहकांच्या सेवेत सुधारणा करणे :**

सुधारीत विद्युत अधिनियम २००३ नुसार वीज क्षेत्रात खूला प्रवेश व समांतर परवानाधारकाचे आगमन सहज शक्य झाले आहे. त्यामुळे आता महावितरणच्या ग्राहकांना महावितरण कंपनी ऐवजी कोणत्याही वीज वितरणाचा परवाना धारक कंपनीकडून वीज पुरवठा घेण्याचा पर्याय उपलब्ध आहे. योग्य सेवा, वीज पुरवठा अखंडीत असणे, किंवा स्वस्त वीज दराने मिळणे या कारणाकरिता ग्राहकांना कंपनी बदलता येईल.

म्हणून आपल्या वीज ग्राहकांनी अन्य कंपन्यांकडे जाऊ नये यासाठी ग्राहक सेवेत सतत सुधारणा करणे आवश्यक झाले आहे.

**ड) प्रकल्पांचे व्यवस्थापन आणि कार्यवाही :**

पायाभूत सुविधांची सुधारणा करण्यासाठीच्या योजनांची अंमलबजावणी करतांना त्यातील प्रत्येक प्रकल्प वेळेवर कार्यान्वित होणे व त्यांचे योग्य व न्याय्य व्यवस्थापन करणे महत्वाचे आहे. गुंतवणूकीचे उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी व वितरण व्यवस्थेतील विद्यमान पायाभूत रचना सुधारण्यासाठी, पायाभूत सुविधांच्या योजना वेळेवर पूर्ण करणे व त्या वेळेवर कार्यान्वित करणे याबाबत महावितरणने वेळोवेळी आढावा घेतला पाहिजे.

**इ) थकबाकीची वसूली :**

महावितरणची देयकाची रक्कम वसूल करण्याची कार्यक्षमता आता सुमारे १०० टक्के पर्यंत वाढली आहे. तरीही गतकाळातील मोठ्या प्रमाणात थकबाकी वसूल करावयाची आहे. यासाठी निश्चित उद्दिष्ठे ठरवून थकबाकी वसूल करण्याची नितांत आवश्यकता आहे.

**फ) नियामका विषयी जागरुकता :**

कंपनीवर तसेच कंपनीच्या ग्राहकांवर परिणाम करणारे धोके नियामकांकडूनही येऊ शकतात, ते आधीच ओळखून त्याचे प्रमाण कमी करण्याची गरज आहे. म्हणून नियमनाविषयीच्या तरतूदी संबधी कर्मचा-यांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी त्यांना प्रशिक्षण देणे व त्यातून अशा जोखीमा ओळखण्याची क्षमता वाढविणे आवश्यक आहे.

## १६.कार्याची योजना (Operational Plan) :

**अ )भांडवलीखर्च व भांडवलीकरण :**

महावितरण कंपनी या वित्तीय वर्ष २०११-१२ ते वित्तीय वर्ष २०१५-१६ या काळातील भांडवली खर्च आणि भांडवलीकरण याचाी माहिती खाली तक्त्यात सारांशाने दिली आहे.

**(रु. कोटीत)**

| तपशील | वित्तीय वर्ष २०११-१२ (प्रत्यक्ष) | वित्तीय वर्ष २०१२-१३ (अंदाजित) | वित्तीय वर्ष २०१३-१४ (प्रक्षेपित) | वित्तीय वर्ष २०१४-१५ (प्रक्षेपित) | वित्तीय वर्ष २०१५-१६ (प्रक्षेपित) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवली खर्च | ६,६३६ | ५,३१६ | ५,४७८ | ३,९०० | २,३८८ |
| भांडवलीकरण | ६,७६९ | ७,३९८ | ५,८७६ | ४,२६२ | २,७८१ |

**ब) विक्री प्रक्षेप :**

डिसेंबर २०१२ पर्यंतचे प्रत्यक्ष विक्री व पुर्वीच्या कालावधीतील वीज विक्री यांच्या C.A.G.R. यांच्या आधारे महावितरणने वित्तीय वर्ष २०१२-१३ ते वित्तीय वर्ष २०१३-१४ या काळातील विक्री प्रक्षेपित केली आहे.

**(द.ल.यु.)**

| तपशील | वित्तीय वर्ष २०११-१२ (प्रत्यक्ष) | वित्तीय वर्ष २०१२-१३ (अंदाजित) | वित्तीय वर्ष २०१३-१४ (प्रक्षेपित) | वित्तीय वर्ष २०१४-१५ (प्रक्षेपित) | वित्तीय वर्ष २०१५-१६ (प्रक्षेपित) |
|---|---|---|---|---|---|
| उच्च दाब श्रेणी | ३०,३६८ | ३१,१३६ | ३५,७७१ | ३८,८२६ | ४२,१५१ |
| लघु दाब श्रेणी | ४४,२६५ | ४५,३५६ | ४९,६१५ | ५३,६४८ | ५८,०९८ |
| महावितरण विक्री | ७४,६३२ | ७६,४९२ | ८५,३८६ | ९२,४७४ | १००,२४९ |
| डी एफ (श्रेणी नुसार) | ५,५०० | ५,८७८ | ६,४६६ | ७,०२१ | ७,६२६ |
| **महावितरण : एकूण विक्री** | **८०,१३२** | **८२,३७०** | **९१,८५१** | **९९,४९५** | **१०७,८७५** |

**क) वितरण हानी :**

महावितरणने गेल्या काही वर्षात वितरणातील हानी कमी करण्यात उल्लेखनीय यश मिळविले आहे. नियंत्रणाच्या कालावधीत वितरण हानी दरवर्षी ०.५० टक्के इतकी कमी होईल असे गृहीत धरलेले आहे. नियंत्रण कालावधीतील वितरण हानीचे प्रक्षेप खालील तक्त्यात दर्शविण्यात आले आहेत.

| तपशील | वित्तीय वर्ष २०११-१२ (प्रत्यक्ष) | वित्तीय वर्ष २०१२-१३ (अंदाजित) | वित्तीय वर्ष २०१३-१४ (प्रक्षेपित) | वित्तीय वर्ष २०१४-१५ (प्रक्षेपित) | वित्तीय वर्ष २०१५-१६ (प्रक्षेपित) |
|---|---|---|---|---|---|
| वितरण हानी | १६.०३% | १५.५३% | १५.०३ % | १४.५३% | १४.०३% |

## ड ) विज खरेदी :

महावितरणने वीज खरेदीबाबत तीन दृष्टीकोनातून प्रारुप तयार केलेले आहेत. ते करतांना दीर्घ मुदतीचे वीज खरेदी करार, अपेक्षित कामगिरी व त्यासोबत कोळसा संचित करण्याचे धोरण (Coal Pooling Policy) यामुळे इंधनाच्या किमतीत होऊ शकणारी वाढ या बाबी विचारात घेतल्या आहेत. तीन दृष्टीकोनातून वीज खरेदी प्रमाण अन्य सरासरी वीज खरेदी खर्चासह खर्च याचा सारांश पुढील तक्त्यात मांडला आहे.

| दृष्टीकोन | वित्तीय वर्ष २०११-१२ (प्रत्यक्ष) | | | वित्तीय वर्ष २०१२-१३ (अंदाजे ) | | | वित्तीय वर्ष २०१३-१४ (प्रक्षेपित) | | | वित्तीय वर्ष २०१४-१५ (प्रक्षेपित) | | | वित्तीय वर्ष २०१५-१६ (प्रक्षेपित) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | द.ल.यू. | रु.कोटीत | रु/केडब ल्यूएच | द.ल.यू. | रु.कोटीत | रु/के डब्ल्यूएच | द.ल.यू. | रु.कोटीत | रु/केड ब्ल्यूएच | द.ल.यू. | रु.कोटीत | रु/के डब्ल्यूएच | द.ल.यू. | रु.कोटीत | रु/के डब्ल्यूएच |
| वास्तववादी | ९८,६६२ | ३२,९२१ | ३.३४ | १०१,७४६ | ३५,८६९ | ३.५३ | ११५,४३७ | ४२,६८५ | ३.७० | १४४,७७९ | ५७,०५८ | ३.९४ | १६२,००८ | ६७,०८५ | ४.१४ |
| निराशावादी | | | | | | | ११४,६१३ | ४५,०७५ | ३.९३ | १३३,८५० | ५६,६४० | ४.२३ | १५१,५३७ | ६७,९६० | ४.४८ |
| आशावादी | | | | | | | १२०,५४० | ४४,५५१ | ३.७० | १५२,१९० | ५९,७०९ | ३.९२ | १६६,७८१ | ६८,९५३ | ४.१३ |

## इ) पुरवठ्याचा सरासरी खर्च :

खालीला तक्त्यात महावितरणने बहुवर्षीय दराच्या दुस-या नियंत्रण कालावधीतील - वित्तीय वर्ष २०११-१२ ते २०१५-२०१६ यात विविध (तीन) दृष्टीकोनातून केलेले सरासरी पुरवठा खर्चाचे प्रक्षेप दर्शविले आहेत.

| दृष्टीकोन | तपशील | वित्तीय वर्ष २०११-१२ (प्रत्यक्ष) | वित्तीय वर्ष २०१२-१३ (अंदाजे) | वित्तीय वर्ष २०१३-१४ (प्रक्षेपित) | वित्तीय वर्ष २०१४-१५ (प्रक्षेपित) | वित्तीय वर्ष २०१५-१६ (प्रक्षेपित) |
|---|---|---|---|---|---|---|
| वास्तववादी | वार्षिक महसूलाची आवश्यकता (रु.कोटीत) | ४१,९७६ | ४७,४९८ | ५७,७९७ | ६७,०७८ | ७५,८५९ |
| | विक्री दशलक्ष यूनीट | ८०,१३२ | ८२,३७० | ९१,८५१ | ९९,४९५ | १०७,८७५ |
| | सरासरी पुरवठा खर्च (रु/केडब्ल्यूएच) | ५.२४ | ५.७७ | ६.२९ | ६.७४ | ७.०३ |
| निराशावादी | वार्षिक महसूलाची आवश्यकता (रु.कोटीत) | ४१,९७६ | ४७,४९८ | ६०,४४९ | ६९,८७८ | ७९,८७५ |
| | विक्री दशलक्ष यूनीट | ८०,१३२ | ८२,३७० | ९१,८५१ | ९९,४९५ | १०७,८७५ |
| | सरासरी पुरवठा खर्च (रु/केडब्ल्यूएच) | ५.२४ | ५.७७ | ६.५८ | ७.०२ | ७.४० |
| आशावादी | वार्षिक महसूलाची आवश्यकता (रु.कोटीत) | ४१,९७६ | ४७,४९८ | ५८,११६ | ६७,३३२ | ७६,०९३ |
| | विक्री दशलक्ष यूनीट | ८०,१३२ | ८२,३७० | ९१,८५१ | ९९,४९५ | १०७,८७५ |
| | सरासरी पुरवठा खर्च (रु/केडब्ल्यूएच) | ५.२४ | ५.७७ | ६.३३ | ६.७७ | ७.०५ |

महावितरण तर्फे येथे नमूद करण्यात येते की, महावितरणाने फक्त वीज खरेदीचे तीन दृष्टीकोनातून स्वरुप / चित्रे सादर केली आहेत.

आशावादी दृष्टीकोनातून चित्र रेखाटताना, महावितरणने आशावादी दृष्टीकोनातून विचार केला आहे व जादा विजेची उपलब्धता प्रक्षेपित केलेली आहे. उच्च प्रमाणात वीज उपलब्धता विचारात घेतल्यास परिणामी एकूण परिस्थितीनुसार सरासरी वीज खरेदी खर्च प्रति युनीट सुध्दा वाढीवच राहील. मात्र आशावादी दृष्टीकोनातून विचार केल्यास वीज खरेदी खर्च प्रती युनीट किंचित कमी झालेला आहे.

आशावादी दृष्टीकोनातून विचार करतांना, वार्षिक महसूलाच्या आवश्यकतेचे (ARR) इतर घटक म्हणजे संचालन व सुव्यवस्थेचे खर्च, घसारा, व्याज, समभागावरील परतावा इत्यादी आणि विजेची विक्री ही तशीच राहीलेली आहे. त्यामुळे आशावादी दृष्टीकोनातून पाहतांना वार्षिक महसुलाची आवश्यकता वाढलेली आहे. परिणामी काही अन्य घटक म्हणजे बुडीत कर्जासाठी तरतूद ही सुध्दा वाढलेली आहे म्हणून आशावादी दृष्टीकोनातून मांडलेल्या चित्रात "वार्षिक महसूलाची आवश्यकता" जास्त मांडली आहे.

## १७. विनंती अर्ज / प्रार्थना

मा.महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगास, महावितरण तर्फे विनंती/ प्रार्थना करण्यात येते की, त्यांनी खालील बाबींना मंजूरी द्यावी.

१) महावितरणने नियंत्रण कालावधी [वित्तीय वर्ष २०१३-१४ ते वित्तीय वर्ष २०१५-१६] यासाठी, मा.महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग (बहूवर्षीय दर) विनियम २०११ यातील नियमन क्र. ४.२ आणि ७.१ यानुसार वितरण व्यवसायासाठी केलेला व्यवसाय आराखडा (योजना) दाखल करुन घ्यावा.

२) मा.महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाचे (बहूवर्षीय दर MYT) नियमन २०११ यातील नियमन क्र. ४.२ आणि ७.१ यानुसार, महावितरण कंपनीच्या नियंत्रण कालावधी [वित्तीय वर्ष २०१३-१४ ते वित्तीय वर्ष २०१५-१६] यासाठीच्या वितरण व्यवसाय आराखड्यास, मंजुरी द्यावी.

३) महावितरणने वार्षिक महसूलाची आवश्यकता (ARR) यासाठी प्रक्षेप करण्यासाठी प्रस्तावित केलेली पध्दती मिमांसा (Methodology) आणि तत्वे यांना मंजूरी द्यावी.

४) नियंत्रण कालावधीत जर अंतीम हस्तांतरण योजना अधिसूचित झाली, तर मालमत्तांचे अंतिम हस्तांतरण मूल्य विचारात घेण्याची व त्यानुसार व्यवसाय आराखड्यात सुधारणा करण्याची परवानगी असावी.

५) पुढील दर निश्चिती करण्याच्या कामकाजाच्या वेळी विलंबित इंधन समायोजन खर्च (Delayed FAC) यासाठीचा खर्च समाविष्ट करण्यास परवानगी मिळावी.

६) या व्यवसाय आराखड्याच्या कालावधी म्हणजे वित्तीय वर्ष २०१३-१४ ते वित्तीय वर्ष २०१५-१६ दरम्यान, महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग नियमन २०११ यातील तरतूदीमध्ये विहित केलेल्या काही मापदंडांच्या (Parameters) प्रमाणकांबाबत (Norms) काही तफावत (Variation) झाले असल्यास, त्याला मंजूरी द्यावी.

७) महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगास, या प्रकरणाच्या परिस्थितीनुसार योग्य ठरेल अशी आणि न्यायाच्या हितास्तव असणारा अन्य कोणताही आदेश देण्यात यावा.

८) कोणतीही चूकभूल झाली असल्यास ती क्षमापित करावी आणि ती सुधारण्याची संधी द्यावी.

९) या व्यवसाय आराखड्यात, पुढे वेळोवेळी आवश्यकता निर्माण झाल्यास, महावितरण कंपनीस त्यानुसार आणखी माहिती सादर करणे, व्यवसाय आराखड्यात भर करणे आणि बदल करणे यासाठी परवानगी मिळावी.